खालील (क्यू आर कोड) स्कॅन करा...
आणि अक्षराज मीडियाच्या व्हाट्सअप चॅनल ला फॉलो करा व मिळवा सर्व घडामोडींचे अपडेट्स एकाच वेळी एकाच ठिकाणी...
कृपया इथे स्कॅन करा
Plz Scan Here

दैनिक
# अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
Email : newsaksharaj2021@gmail.com




वर्ष : ०५ | अंक : १२२, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, सोमवार, दि.१५ डिसेंबर २०२५ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

## डीजेबाबत मोठी बातमी: बंदीचा निर्णय घेतला जाणार?

**अक्षराज : वृत्तसंकलन**


**दि.१४, नागपूर :** राज्यात वाढत्या ध्वनी प्रदूषणामुळे नागरिक त्रस्त असून त्याचा थेट परिणाम आरोग्यावरही होत असल्याचे चित्र आहे. या पार्श्वभूमीवर सोलापूर शहराने 'डीजे-मुक्त शहर' ही संकल्पना यशस्वीपणे राबवली असून हाच पॅटर्न संपूर्ण राज्यात अमलात आणून महाराष्ट्र डीजे-मुक्त करावा, अशी मागणी भाजपचे विधानपरिषद सदस्य श्रीकांत भारतीय यांनी केली.



विधानपरिषदेत लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून भारतीय यांनी हा मुद्दा उपस्थित केला. ध्वनी प्रदूषणामुळे ज्येष्ठ नागरिक, रुग्ण, विद्यार्थी आणि लहान मुलांचे आरोग्य धोक्यात येत असल्याचे त्यांनी नमूद केले. सोलापूरमध्ये प्रशासन, पोलिस आणि नागरिकांच्या सहकार्याने डीजेवर नियंत्रण आणण्यात यश आल्याचे उदाहरण त्यांनी दिले. आज सोलापुरात सर्व धार्मिक कार्यक्रमांमधून डीजे बाद झाला आहे. तेथे आपली पारंपारिक वाद्य वाजत आहेत. त्यामुळे राज्यभर अशाच प्रकारची अंमलबजावणी करावी, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. यावर उत्तर देताना पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांनी ध्वनी प्रदूषणाचा त्रास होतो, हे वास्तव असल्याचे मान्य केले. सोलापूर पॅटर्न निश्चितच कौतुकास्पद असल्याचे सांगत, ध्वनी मर्यादा ओलांडून तसेच रात्री दहा नंतर डीजे वाजवण्यास कोणतीही परवानगी नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. असे प्रकार घडतात ते अवैधरीत्या होत असल्याचे सांगून, तक्रार प्राप्त झाल्यास त्यावर कारवाई केली जाते, असेही मुंडे म्हणाल्या. तसेच, ध्वनी प्रदूषणाबाबत कारवाई करण्याचे अधिकार मुख्यतः पोलिसांकडे असल्याने पर्यावरण मंत्रालयाची भूमिका मर्यादित असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेस (अप) चे आमदार अमोल मिटकरी यांनी राज्यात डीजेवर कायमस्वरूपी बंदी आणावी आणि सोलापूर पॅटर्न संपूर्ण महाराष्ट्रात राबवावा, अशी ठाम मागणी केली. यावर उत्तर देताना मंत्री मुंडे यांनी, मंत्रालयाकडून सक्ती करता येत नसल्याचे सांगितले. हा निर्णय समाजाने स्वतःहून घ्यायला हवा, नागरिकांनी आणि लोकप्रतिनिधींनीही जनजागृती करावी, असं आवाहन त्यांनी केलं.

## समृद्धीवर टायरने केला घात!
## पाटोळे शिवारानजीक भीषण अपघात



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१४, नाशिक :** समृद्धी महामार्गावर वेग, वाहनांची क्षमतेपेक्षा अधिक प्रवासी, टायरची देखभाल न होणं, चालकांचा थकवा आणि रात्रीची धावती वाहतूक अशा विविध कारणांमुळे सातत्याने अपघात होत आहेत. या अपघातांमध्ये अनेकांना आपला जीव गमवावा लागत असून, महामार्गावरील सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. काही ठिकाणी नियंत्रणाचा अभाव, तर काही ठिकाणी वाहनांच्या तांत्रिक बिघाडामुळे भीषण दुर्घटना घडत असल्याचं चित्र आहे.

मुंबई-नागपूर समृद्धी महामार्ग, महाराष्ट्राच्या विकासाची आणि दळणवळणाची गती वाढवणारा महत्त्वाकांक्षी प्रकल्प. मात्र, हा महामार्ग सध्या त्याच्या वेगळ्या कारणांमुळे चर्चेत आहे: अपघातांची वाढती संख्या आणि त्यातील बळींची वाढती आकडेवारी. महामार्गावरील वेग, वाहन चालकांचा थकवा, झोपेची डुलकी आणि टायर फुटणे ही अपघातांची प्रमुख कारणे ठरत आहेत. सहा लेनच्या या प्रशस्त मार्गावर वेगावर नियंत्रण ठेवण्यात वाहनचालक अपयशी ठरत आहेत, परिणामी अनेकांचा अकाली मृत्यू होत आहे. याच मालिकेतील एक अत्यंत हृदयद्रावक आणि भीषण घटना सिन्नरजवळ नुकतीच घडली आहे, ज्यात विवाह सोहळ्याला जाणाऱ्यांना या भयावह घटनेतून फटका बसला आहे.

## नायलॉन मांजामुळे जीवितास धोका
## वापर व विक्री करणाऱ्यांवर कठोर कारवाईचा इशारा

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.१४, विंचूर (नाशिक) :** नायलॉन मांजाचा वापर, विक्री व साठवणूक करणे हा कायद्याने गुन्हा असून, त्यातून गंभीर अपघात घडत असल्याचे वारंवार निदर्शनास येत आहे. नायलॉन मांजामुळे दुचाकीस्वार, पादचारी, लहान मुले तसेच पक्षी व प्राणी गंभीर जखमी होत असून, काही घटनांमध्ये जीवितहानीदेखील झाली आहे. त्यामुळे नायलॉन मांजा वापरणारे, विक्री करणारे अथवा साठवणूक करणाऱ्यांविरुद्ध कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचा इशारा लासलगाव पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक भास्करराव शिंदे यांनी दिला आहे.

पतंगोउत्सव काळात नायलॉन मांजाचा सर्रास वापर होत असल्याचे दिसून येत असून, हा मांजा अत्यंत धारदार व प्राणघातक असल्याने रस्त्यावरून ये-जा करणाऱ्या नागरिकांसाठी मोठा धोका निर्माण झाला आहे. विशेषतः दुचाकीस्वारांच्या मानेला व चेहऱ्याला गंभीर जखमा होण्याच्या घटना वारंवार घडत आहेत.

शासनाने नायलॉन मांजाच्या विक्रीवर बंदी घातलेली असतानाही काही ठिकाणी छुप्या पद्धतीने त्याची विक्री सुरू असल्याची माहिती पोलिसांना मिळत आहे. अशा विक्रेत्यांवर गुन्हे दाखल करून कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे. तसेच नायलॉन मांजा वापरताना कोणी आढळून आल्यास त्याच्यावरही कोणतीही तडजोड न करता कठोर कारवाई केली जाईल, असेही शिंदे यांनी स्पष्ट केले.

नागरिकांनी कायद्याचे पालन करावे, नायलॉन मांजाचा वापर टाळावा.

## विश्रांतवाडीत अल्पवयीन मुलीवर अत्याचार



**अक्षराज : प्रणिल कुसाळे**

**दि.१४, पुणे :** पुण्यातील विश्रांतवाडी परिसरात शाळेत निघालेल्या एका अल्पवयीन मुलीवर महाविद्यालयात शिकणाऱ्या तरुणाने अत्याचार केल्याची संतापजनक घटना उघडकीस आली आहे. ४ डिसेंबर रोजी घडलेल्या या घटनेने परिसरात खळबळ उडाली असून पालकांमध्ये तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. आरोपीने बसस्थानकावर पीडित मुलीशी ओळख वाढवली, तिचा विश्वास संपादन केला आणि शाळेत सोडतो असे सांगून तिला वेगळ्या ठिकाणी नेऊन तिच्यावर अत्याचार केल्याचा आरोप आहे. काही दिवसांनी मुलीने घडलेला प्रकार पालकांना सांगितल्यानंतर विश्रांतवाडी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली.

या प्रकरणामुळे विश्रांतवाडी परिसरातील वाढत्या छेडछाड, छुप्या टवाळखोरी आणि अल्पवयीन मुलींच्या सुरक्षिततेचा गंभीर प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. स्थानिक नागरिकांच्या मते, बसस्टॉप, चौक तसेच शाळा-महाविद्यालयांच्या परिसरात संशयास्पद तरुणांची वर्दळ वाढली असून मुलींना त्रास देण्याचे प्रकार सातत्याने घडत आहेत. मात्र याकडे संबंधित यंत्रणा गांभीर्याने पाहताना दिसत नाहीत, ही मोठी शोकांतिका आहे.

पालकांनी आपल्या मुलांच्या सुरक्षिततेबाबत सतर्क राहणे गरजेचे असले, तरी केवळ पालकांची जबाबदारी म्हणून हा प्रश्न झटकून चालणार नाही. शाळा, कॉलेज परिसरात पोलीस गस्त वाढवणे, बसस्टॉप व चौकांवर सीसीटीव्ही कार्यान्वित ठेवणे आणि तक्रारींवर तात्काळ कठोर कारवाई करणे आवश्यक आहे. अल्पवयीन मुलींच्या सुरक्षिततेशी तडजोड करणाऱ्यांवर कठोरात कठोर कारवाई झालीच पाहिजे, अशी जोरदार मागणी नागरिकांकडून होत आहे.

## आता सिडकोची घरे १० टक्क्यांनी स्वस्त : १९,००० घरांची महागृहनिर्माण योजना

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.१४, नवी मुंबई :** नवी मुंबईतील सिडकोच्या वेगवेगळ्या प्रवर्गातील असलेल्या घरांच्या किंमती थेट १० टक्क्यांनी स्वस्त करण्याची घोषणा महाराष्ट्र शासनातर्फे करण्यात आली आहे. या निर्णयामुळे आता ही घरे पूर्वीपेक्षा स्वस्त दरात उपलब्ध होणार असून नवी मुंबई परिसरात घर घेण्याचे सर्वसामान्यांचे स्वप्न आता अधिक सुकर होणार आहे. त्याचप्रमाणे सिडकोतर्फे नवी मुंबईतील वाशी, बामणडोंगरी, खारकोपर, खारघर, तळोजा, मानसरोवर, खांदेश्वर, पनवेल व कळंबोली या महत्वपूर्ण नोड्समध्ये १९,००० घरांची महागृहनिर्माण योजना दिनांक १४ डिसेंबर २०२५ रोजी जाहीर करण्यात आली आहे. या योजनेमध्ये नोंदणी करण्याची प्रक्रिया सुरू झाली असून इच्छुक नागरिकांनी www.cidcohomes.com अधिक माहितीसाठी या संकेतस्थळास भेट द्यावी. सिडकोच्या घरांच्या किंमतींमध्ये १० टक्के कपात करण्याचा शासनातर्फे घेण्यात आलेला निर्णय हा सामान्य माणसाच्या घराच्या स्वप्नाला बळ देणारा असून, सिडकोच्या गृहनिर्माण योजनांमध्ये सहभागी होऊ इच्छिणाऱ्या लाखो अर्जदारांना मोठा दिलासा देणारा आहे. जे नागरिक नवी मुंबईत घर घेण्यास इच्छुक आहेत, त्या नागरिकांना या निर्णयाचा थेट लाभ होणार आहे. जागतिक दर्जाच्या नवी मुंबई शहरात प्रत्येक सर्वसामान्य नागरिकाचे स्वतःचे घर असावे, यासाठी राज्य शासन सातत्याने प्रयत्नशील आहे. असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले. सिडकोच्या



घरांच्या किंमतीमध्ये १० टक्क्यांची कपात करण्याचा निर्णय हा सर्वसमावेशक व परवडणाऱ्या गृहनिर्माण उद्दिष्टांशी सुसंगत आहे. यामुळे सर्व अर्जदारांना घर स्वस्तात मिळवण्याची पुनःश्च सुवर्णसंधी मिळणार आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदीजी यांच्या 'सर्वांसाठी घरे' या संकल्पनेला बळ देण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. यामुळे सर्वसामान्य नागरिकांना परवडणाऱ्या दरात अधिकृत आणि चांगल्या दर्जाची घरे मिळणे शक्य होणार आहेत. असे उपमुख्य मंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले.

महाराष्ट्र शासनाच्या या महत्वपूर्ण निर्णयामुळे माझे पसंतीचे सिडकोचे घर या योजनेअंतर्गत (दि.१२ ऑक्टोबर २०२४ रोजी प्रारंभ) बामणडोंगरी, कळंबोली, खारकोपर, खारघर, खांदेश्वर, मानसरोवर, पनवेल, वाशी व तळोजा या सर्व नोडमधील घरांच्या किंमती देखील १०% नी स्वस्त झाल्या आहेत. ही सुधारित किंमत विद्यमान लाभार्थी तसेच भावी अर्जदार दोघांनाही लागू राहणार आहेत. असे सिडकोचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल यांनी सांगितले.

तसेच अल्प उत्पन्न गट आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक प्रवर्गातील घरे लक्षणीयरीत्या अधिक परवडणारी ठरणार आहेत. विशेषतः आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक प्रवर्गातील घरखरेदीदारांना प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत मिळणाऱ्या रू.२.५ लाखांच्या अनुदानासोबतच १०% स्वस्त किंमतींचा एकत्रित लाभ मिळणार असून, त्यामुळे एकूण आर्थिक भार कमी होऊन घर घेणे अधिक सुलभ होणार आहे.

तसेच, या योजनेच्या १९ फेब्रुवारी २०२५ रोजी काढलेल्या सोडतीमध्ये यशस्वी ठरलेल्या परंतु घरे परत (सरेंडर) केलेल्या अर्जदारांना देखील सुधारित अटींनुसार पुन्हा एकदा योजनेत सहभागी होण्याची संधी देण्यात येणार आहे. त्यासाठी या अर्जदारांना वाटप झालेले घर निश्चित करण्यासाठी १० दिवसांची मुदत देण्यात आली आहे. या मुदती दरम्यान संबंधित अर्जदारांना https://cidcohomes.com या संकेतस्थळाला भेट देऊन प्रक्रिया पूर्ण करता येणार आहे.

## कापूस उत्पादक शेतकऱ्यांना मोठा दिलासा...

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१४, चंद्रपूर :** राज्याचे माजी वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री आ. सुधीर मुनगंटीवार यांच्या पाठपुराव्यामुळे चंद्रपूर व यवतमाळसह एकूणच कापूस उत्पादक शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. कापूस खरेदीची मर्यादा गेल्या वर्षीप्रमाणेच कायम ठेवण्याची आग्रही मागणी आ. मुनगंटीवार यांनी केली होती. त्यानुसार शासनाने ही मर्यादा प्रति हेक्टर २३६८ किलो ठेवण्याच्या संदर्भातील आदेश निर्गमीत केले आहेत. आ. मुनगंटीवार यांच्या प्रयत्नांनंतर हे परिपत्रक काढण्यात आले आहे. त्यामुळे कापूस उत्पादक शेतकऱ्यांनी आ. मुनगंटीवार यांचे आभार मानले आहेत.

सीसीआयने ठरविलेली मर्यादा अत्यंत कमी असल्याने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होण्याची शक्यता आहे. हे नुकसान रोखण्यासाठी 'मागील वर्षाप्रमाणेच कापूस खरेदीची मर्यादा कायम ठेवावी' अशी आग्रही मागणी आ. मुनगंटीवार यांनी दि. ३ डिसेंबरला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची प्रत्यक्ष भेट घेऊन केली होती. या गंभीर विषयावर मुख्यमंत्री यांनी तत्काळ प्रतिसाद देत कृषी आणि सहकार विभागाच्या प्रधान सचिवांना त्वरीत कार्यवाहीचे निर्देश दिले होते. त्यानुसार दि. ११ डिसेंबरला यासंदर्भातील आदेश निर्गमीत करण्यात आले आहे. कापूस खरेदीसाठी प्रती हेक्टरी १३.५७ क्विंटलची अत्यल्प मर्यादा जाहीर करण्यात आली असून प्रत्यक्षात चंद्रपूर व यवतमाळ जिल्ह्यातील शेतकरी २५ ते ४० क्विंटल प्रतिहेक्टर उत्पादन घेणारे आहेत. त्यामुळे या निर्णयामुळे शेतकऱ्यांचे गंभीर आर्थिक नुकसान होणार आहे. सन २०२४-२५ मध्ये या दोन्ही जिल्ह्यांसाठी ३० क्विंटलची मर्यादा लागू होती आणि शेतकऱ्यांनी त्यानुसार खरेदी-विक्री प्रक्रिया पूर्ण केली होती. त्यामुळे चालू हंगामातही ३०-४० क्विंटलचीच मर्यादा ठेवण्याची मागणी आ. मुनगंटीवार यांनी मुख्यमंत्र्यांकडे केली होती. दि.११ डिसेंबरला शासनाने काढलेल्या परिपत्रकात मर्यादा वाढविण्याची घोषणा केली आहे. 'राज्यातील उच्चत्तम उत्पादकता असलेल्या तीन जिल्ह्यांची सरासरी विचारात घेऊन राज्यातील सर्व जिल्ह्यांसाठी खरीप २०२५ मध्ये उत्पादीत झालेल्या कापूस खरेदीसाठी २३६८ किलो प्रति हेक्टर ही उच्चतम मर्यादा ठेवण्यात येत आहे,' असे या आदेशात म्हटले आहे. शेतकरी सध्या त्यांचे कापूस उत्पादन शासनाच्या खरेदी केंद्रावर किमान आधारभूत किंमतीनुसार विक्रीकरीता घेऊन जात आहेत. शेतकरी अद्यावत तंत्रज्ञान, सिंचन इत्यादीचा वापर करुन जादाचे उत्पादन घेण्याचा कायम प्रयत्न करत असतात. तथापि, काही शेतकऱ्यांचे सरासरी उत्पादनापेक्षा जादाचे उत्पादन खरेदी केंद्रावर विक्रीसाठी जातात. मात्र प्रत्यक्षात जादा उत्पादन असूनही खरेदी केंद्रावर कापूस विक्री करताना त्या शेतकऱ्यांना अडचणींना सामोरे जावे लागते. याबाबत लोकप्रतिनिधी व शेतकऱ्यांकडून सातत्याने शासनास विचारणा होत होती. त्यानंतर ही मर्यादा प्रति हेक्टर २३६८ किलोपर्यंत वाढविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, असेही या परिपत्रकात स्पष्ट करण्यात आले आहे. आ. मुनगंटीवार यांनी या विषयाचे गांभिर्य लक्षात घेऊन सीसीआयचे संचालक ललितकुमार गुप्ता यांच्याशी देखील दूरध्वनीवर चर्चा केली होती. आ. मुनगंटीवार यांच्या पुढाकारामुळे प्रशासनाने सकारात्मक भूमिका घेत शेतकरी हिताचा निर्णय घेतला आहे.

### शेतकऱ्यांसाठी कायम पुढाकार !

पालकमंत्री असताना त्यांनी जिल्ह्यातील शेतकऱ्यांना विक्रमी २०२ कोटींचा पीक विमा मिळवून दिला. अलीकडेच २० हजार हेक्टरनुसार मिळणाऱ्या धान बोनससाठी २२७ कोटी रुपयांची तरतूद करून ती शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्यास त्यांचा पाठपुरावा कारणीभूत ठरला. धान चुकत्याचे २७.५२ कोटी रुपये मंजूर करवून शेतकऱ्यांना दिलासा देण्याचे काम त्यांच्या पुढाकारातून झाले.

विशेष म्हणजे नागपूर येथे सुरू असलेल्या अधिवेशनात पुन्हा धान बोनस देण्याची आग्रही मागणी त्यांनी केली असून शेतकऱ्यांच्या प्रत्येक प्रश्नावर सातत्याने लढण्याची त्यांची तयारी हीच त्यांची कार्यशैली सिद्ध करते.




## वाट मोकळी झाली...

चैतन्यशील संवाद आणि विचारांचा मुक्त प्रवाह हाच पाया अपेक्षित असणारी भारतीय संसद, 'वंदे मातरम्' या सहाच अक्षरांच्या पण देशाच्या इतिहासाच्या एका महत्त्वाच्या प्रतीकाला सामोरी गेली. हिवाळी अधिवेशनादरम्यान या गीताच्या १५०व्या वर्धापन दिनानिमित्त लोकसभा आणि राज्यसभेतल्या या विशेष चर्चेनं आणखी एक गोष्ट स्पष्ट केली. ती अशी की ही केवळ एखाद्या देशभक्तिपर गीतावरची औपचारिक चर्चा नव्हे, तर राष्ट्राची ओळख, सांस्कृतिक स्मृती आणि ऐतिहासिक जाणीव पुनरुज्जीवित करण्याची ती संधी ठरली.


राजकारणात सोयीच्या ठरणाऱ्या प्रतीकांचं राजकारण अनेकदा इतक्या भावना उत्तेजित करतं की अर्थव्यवस्था, शिक्षण, बेरोजगारी यांसारख्या खऱ्या समस्या त्याआड दडतात. या दोन्हींमध्ये संतुलन राखत इतिहास आणि सांस्कृतिक वारशाचा आदर आणि दुसरीकडे सध्याच्या समस्या सोडवण्याची जबाबदारी संसदेचीच. गेल्या १५-१७ वर्षांत संसदेत गंभीर विषयांवर सकस चर्चा झाल्याचे प्रसंग विरळ होत असताना या दोन विषयांवर आणि अखेरच्या आठवड्यात प्रदूषणाच्या अक्राळविक्राळ संकटावर राहुल गांधी यांच्या सूचनेनुसार होणाऱ्या प्रस्तावित चर्चेबरोबरच हिवाळी अधिवेशनाचा समारोप दृष्टिपथात आला आहे.

पंतप्रधानांनी लोकसभेत सुरू केलेल्या या व्यापक चर्चेमुळे प्रतीकं केवळ प्रतीकं राहता कालौघात संस्कृतीची वाहक कशी बनतात, त्यालाही उजळा मिळाला. तात्कालिक निमित्त पश्चिम बंगालची निवडणूक असो की अन्य काही, स्वातंत्र्यानंतर साडेसात दशकांनी या विषयावर चर्चा झाली हे महत्त्वाचं. सत्ताधारी पक्षानं हा देशाच्या वारशाचा आणि सांस्कृतिक अभिमानाचा उत्सव मानला, तर विरोधकांनी सध्याच्या आव्हानांपासून लक्ष विचलित करण्याचा प्रयत्न म्हणून त्यावर टीका केली. वंदे मातरम सारखा विषय कितीही निर्मळ असला तरी आपापल्या राजकीय भूमिकांच्या पलीकडे तटस्थपणे पाहणं आजकाल किती अशक्य बनलं आहे, किंबहुना कशातही राजकारण आणताना त्याच्या पलीकडे जाण्याची शक्ती राजकीय पक्षांनी-नेत्यांनी गमावली आहे का, अशी शंका यावी अशी भावना 'वंदे मातरम्'वरील चर्चेत लोकसभेतल्या पहिल्या भाषणापासून राज्यसभेतल्या अखेरच्या वक्त्यांपैकी बहुतांश भाषणांतून दिसली. तरी या चर्चेचं महत्त्व कमी होत नाही.

'वंदे मातरम्'बद्दल मते वेगवेगळी असणं आणि ती तीव्र असणंही स्वाभाविक आहे. राष्ट्रीय श्रद्धेचं प्रतीक, एक दर्जेदार काव्य तसंच देशाच्या स्वातंत्र्याच्या इतिहासाचा साक्षीदार आणि धार्मिक अभिव्यक्तीचा संवेदनशील प्रश्न असे मतभेद मांडावेत अशा संवादासाठी संसदेपेक्षा योग्य व्यासपीठ दुसरं नाही. इतिहासाची दुसरीही बाजू म्हणजे 'वंदे मातरम्'च नव्हे तर स्वातंत्र्यानंतर ज्या विषयांना हातच लावायचा नाही, असा जणू अलिखित नियम होता असे राम मंदिर, कलम ३७०, तिहेरी तलाक, वक्फ मंडळांचा सावळागोंधळ यासारखे विषय संसदीय चर्चेच्या परिघात आणण्याचं श्रेय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सरकारकडं जातं. नरसिंह राव यांच्यानंतर (१९९१) तेवीस वर्षांनी प्रथमच १९१४- २०२४ पर्यंतची सलग दोन सरकारं मोदींच्या नेतृत्वाखालील व सुस्पष्ट बहुमताची होती.

संघाच्या अजेंड्यावरचे विषय संसदेत येत असल्याचा आरोप आहेच, पण हे लक्षात घ्यावं लागेल की जे विषय संसदेत आणले तर भारताची एकता, सार्वभौमत्वाचं काय होईल, असा प्रश्न सातत्यानं उपस्थित केला गेला होता, ते खरं नाही हे या सरकारनं सिद्ध करून दाखवलं. भारतीय लोकशाही इतकी तकलादू नव्हे की आतापावेतो सोडून दिलेली दुसरी बाजू संसदेत चर्चेला आणली की लगेच तिला धोका होईल, हेच चर्चेतून सिद्ध झाले. राम मंदिर आंदोलनानंतर देशात निर्माण झालेलं वातावरण ते स्थिर होऊन याच मुद्द्यांवर अधिक प्रगल्भपणे संसदीय चर्चा होऊ शकते. मोहनदास करमचंद गांधी किंवा विनायक दामोदर सावरकर अशा एकाच विषयावरही संसदेत उद्या चर्चा होऊ शकते, हा विश्वास अशाच चर्चेतून मिळतो. सावरकरांवर तर खुद्द इंदिरा गांधींच्या पुढाकारानं १९६६ मध्येच छोटेखानी चर्चा झाली होतीच. मुळात कोणतंही सरकार फक्त धोरणावर चालत नाही. स्पष्ट बहुमत असेल तर आपल्या वैचारिक भूमिकांवर संसदीय मंचावर चर्चा घडवण्याचं भान आपल्याला आहे, हे या सरकारनं दाखवून दिलं. तसं ते अपरिहार्यही होतं.

# लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल



भारताचे पहिले उपपंतप्रधान, पहिले गृहमंत्री, लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांची आज ७५ वि पुण्यतिथी. सरदार वल्लभभाई पटेल यांचा जन्म ३१ ऑक्टोबर १८७५ रोजी आणंद या छोट्याशा गावात झाला. त्यांचे वडील झव्हेरिभाई यांनी १८५७ च्या स्वातंत्र्य लढ्यात भाग घेतला होता. त्यामुळे लहानपणीच त्यांना देशभक्तीचे बाळकडू मिळाले. त्यांच्या संपुर्ण कुटुंबावर स्वातंत्र्य चळवळीचा प्रभाव होता. सरदार पटेल हे हुशार विद्यार्थी होते. त्यांनी वकिलीचे शिक्षण पूर्ण करून बोरसाड येथे वकिली सुरू केली. एक अभ्यासू वकील म्हणून त्यांचे नाव सर्वदूर पोहचले पुढे ते बॅरिस्टर झाले. बॅरिस्टर झाल्यावर अहमदाबाद येथे त्यांनी वकिली सुरू केली. अल्पावधीतच एक निष्णात वकील म्हणून त्यांची कीर्ती देशभर पसरली. वकिलीसोबत त्यांना राजकारणाचीही आवड होती त्यामुळे त्यांनी अहमदाबाद पालिकेची निवडणूक लढवली त्यांनी ती निवडणूक सहज जिंकली. राजकारणात आल्यावर त्यांना जनतेचे मूलभूत प्रश्न समजू लागले. १९१७ साली खेडा जिल्ह्यात प्रचंड पाऊस झाला त्यामुळे खरिपाचे पीक वाया गेले. पुढे उंदराचा सुळसुळाट आणि किटकांमुळे रब्बीचे पीकही गेले त्यामुळे शेतकरी हवालदिल झाले. त्यातच दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाल्याने शेतकऱ्यांच्या हाती २५ टक्क्यांपेक्षाही कमी उत्पादन येईल अशी परिस्थिती निर्माण झाली. नैसर्गिक आपत्तीमुळे हवालदिल झालेल्या शेतकऱ्यांना शेतसाऱ्यात सूट मिळावी, शेतसाऱ्याची वसुली पुढे ढकलावी यासाठी त्यांनी १८ हजार शेतकऱ्यांच्या सह्या असलेले निवेदन सरकारकडे दिले पण सरकारने त्याची दखल न घेता शेतसारा वसुलीसाठी शेतकऱ्यांवर जप्तीचे आदेश दिले त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये असंतोष निर्माण झाला. महात्मा गांधी यांनी सक्तीच्या शेतसारा वसुली विरोधात खेडा येथे सत्याग्रह चळवळ सुरू केली. या चळवळीचे नेतृत्व त्यांनी सरदार पटेल यांच्याकडे सोपवले. शेतकऱ्यांचे हे आंदोलन त्यांनी अत्यंत निर्धाराने यशस्वी केले. या आंदोलनात त्यांनी केलेल्या नेतृत्वाने महात्मा गांधी भारावून गेले. पुढे महात्मा गांधी यांच्या प्रत्येक चळवळीत त्यांनी हिरीरीने भाग घेतला. नेतृत्वाप्रमाणेच त्यांचे वक्तृत्वही प्रभावी होते. आपल्या वक्तृत्वाने जनसामान्यांना प्रभावित करणाऱ्या सरदार पटेलांनी १९२८ साली सायमन कमिशन विरोधात पुकारलेल्या बारडोली सत्याग्रहादरम्यान लोकांना आपल्या महान विचारांनी प्रभावित केले त्यामुळे इंग्रजांनी अवाजवी वाढवलेल्या करांना न भरण्यावर जनता सहमत झाली त्यामुळे ब्रिटिश व्हाइसरॉयला पराभव पत्करावा लागला. या आंदोलनात आपल्या सशक्त नेतृत्वाने वल्लभभाई पटेल जनतेत चांगलेच प्रसिद्ध झाले आणि बारडोलीतील लोक त्यांना सरदार म्हणू लागले त्यामुळे त्यांच्या नावापुढे सरदार जोडले जाऊ लागले. १९३० साली सविनय कायदेभंग चळवळीत भाग घेतला म्हणून त्यांना इंग्रजांनी अटक केली. त्यांना पाच वर्षांचा तुरुंगवास भोगावा लागला. १९४२ च्या चले जाव आंदोलनातही त्यांनी भाग घेतला त्यावेळीही त्यांना अटक झाली. १९४६ झाली स्थापन झालेल्या हंगामी सरकारमध्ये ते गृहमंत्री होते. गृहमंत्री या नात्याने त्यांनी भारत पाक फाळणीच्या चर्चेमध्ये निर्णायक भूमिका बजावली. देश स्वातंत्र्य झाल्यानंतर पंडित नेहरूंच्या नेतृत्वाखालील मंत्रिमंडळात ते उपपंतप्रधान बनले. त्यांच्याकडे गृहखाते, माहिती आणि नभोवाणी, संस्थांनचा प्रश्न व निर्वासितांचा प्रश्न व निर्वासितांचे प्रश्न सारखे महत्वाचे खाते देण्यात आले. स्वातंत्र्य भारताचे गृहमंत्री झाल्यावर सरदार पटेल यांनी सर्वात आधी भारतातील वेगवेगळ्या संस्थानातील राजांना आपल्या दूरदर्शीपणाचा आणि बुद्धिमत्तेचा वापर करून भारतात विलीन होण्याची सूचना केली. बहुतांश संस्थानांनी याला सहमती दर्शवून भारतात विलीन झाले पण जुनागड, हैदराबादचा निजाम, जम्मू काश्मीर च्या राजांनी भारतात विलीन होण्यास नकार दिला. सरदार पटेलांनी आपल्या कुशाग्र बुद्धिमत्तेच्या बळावर सैन्याचा वापर करीत या तिन्ही संस्थानांना भारतात विलीन केले. सरदार पटेल यांनी तत्कालीन ५६५ संस्थाने भारतात विलीन करून एकसंध भारत निर्माण केला त्यांची ही कामगिरी ऐतिहासिक अशीच होती. त्यांच्या याच कामगिरीने त्यांना लोहपुरुष ही पदवी देण्यात आली. १९५० साली त्यांचे स्वास्थ्य बिघडू लागले. २ नोव्हेंबर १९५० ला त्यांचे स्वास्थ्य इतके बिघडले की ते अंथरुणावरुन उठण्यास देखील असमर्थ होते. पुढे १५ डिसेंबर १९५० रोजी हृदय विकाराच्या तीव्र झटक्याने त्यांची प्राणज्योत मालवली. सरदार पटेल यांना विनम्र अभिवादन!

**- श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

# तरुणाईला नशेच्या गर्तेत नेणारा सनबर्न फेस्टिवल हवा कशाला ?

गेल्या काही दिवसांत वृत्तपत्र वाचताना राज्यात कुठेनाकुठे अमली पदार्थाचा साठा पकडल्याच्या बातम्या प्रतिदिन वाचनात येत आहेत. वाचून कोणाचेही डोळे पांढरे व्हावेत एव्हढे या अमली पदार्थांचे बाजारमूल्य असते. अर्थात जेव्हढे अमली पदार्थ पकडले जाते तेव्हढेच वृत्तपत्रांत छापून येते यापेक्षा कित्येक पटीने आज ते राज्यभर वितरित झाले आहे. ज्या राज्याची ओळख जगाच्या पाठीवर छत्रपती शिवाजी महाराजांचा महाराष्ट्र अशी करण्यात येते आज त्या महाराष्ट्राची ओळख देशातील सर्वात कर्जबाजारी राज्य, स्त्री अत्याचारात पहिल्या क्रमांकाचे राज्य अशी होऊ लागली आहे, गेल्या काही दिवसांतील बातम्या वाचल्यावर अमली पदार्थाचा सर्वात जास्त विळखा पडलेले राज्य म्हणून महाराष्ट्र आपली ओळख निर्माण करेल कि काय अशीही भीती आता वाटू लागली आहे. राज्याची सांस्कृतिक राजधानी असलेल्या पुण्यात २०१६ मध्ये सनबर्न फेस्टिव्हल झाला आणि पुण्यात विविध ठिकाणाहून अमली पदार्थाचा साठा पकडल्याच्या बातम्या वाचण्यात येऊ लागल्या. शालेय विद्यार्थीसुद्धा अमली पदार्थांच्या आहारी गेल्याचे गेल्या काही वर्षांत पुण्यात पाहायला मिळाले. विद्येचे माहेरघर म्हणून ओळख असलेल्या पुण्यात देशाच्या कानाकोपऱ्यातून विद्यार्थी शिक्षणासाठी येत असतात. या विद्यार्थ्यांनाच अमली पदार्थांचे रॅकेट चालवणाऱ्यांनी लक्ष्य केले. अमली पदार्थांचे रॅकेट चालवणाऱ्यांचे कनेक्शन थेट राजधानी दिल्लीपर्यंत पोहोचले होते. संगीताच्या नावावर सनबर्न फेस्टिव्हलसारखे कार्यक्रम वर्षाच्या अखेरीस आयोजित केले जातात. भोगवादाला प्रोत्साहन देणारे हे पाश्च्यात्य कार्यक्रम तशाच प्रकारचे वातावरण तयार करतात. या वातावरणात झिंगण्यासाठी मद्यपानाची या ठिकाणी पुरेपूर रेलचेल असते सोबत अमली पदार्थ पुरवणारी माणसेही वावरत असतात जे आपले टार्गेट बरोबर हेरतात. या कार्यक्रमाला धनदांडग्यांचीच मुले अधिक येत असल्याने अमली पदार्थ विकत घेणे यांच्यासाठी विशेष बाब नसते. अमली पदार्थ विकणाऱ्यांसाठी असे फेस्टिव्हल म्हणजे सावज बनवण्यासाठी पर्वणी असते. याठिकाणी हेरलेलया सावजाची शिकार ते येथून बाहेर पडल्यावर पुढील काही काळात पद्धतशीरपणे करतात. एकाच्या मदतीने दुसरा, दुसऱ्याच्या मदतीने तिसरा यांच्या गळाला लागतो आणि नशेच्या आहारी गेलेला तरुण पुढे यांच्याच इशाऱ्यावर नाचू लागतो. नशेखोरीला प्रोत्साहन देणारे आणि भोगवादाला खतपाणी घालणारे असे कार्यक्रम राज्यात हवेत तरी कशाला ? केवळ कोट्यवधींचा महसूल मिळतो म्हणून महाराष्ट्र सरकारने आता राजधानी मुंबईत या फेस्टिव्हलला परवानगी दिली आहे. १७ ते २१ डिसेम्बरला मुंबईतील शिवडी भागात होणाऱ्या या महोत्सवाची जोरदार तयारी सुरु आहे. जे पुण्यात घडले तेच पुढील काही वर्षांत मुंबईत होणार हे निश्चित आहे. एकीकडे आम्ही शिवरायांचे मावळे असल्याच्या बतावण्या करून जनतेला भावनिक साद घालायची आणि दुसरीकडे संस्कृतीचे भंजन करू पाहणाऱ्या, तरुणाईला नशेच्या गर्तेत ढकलणाऱ्या पाश्च्यात्य फेस्टिव्हलला आर्थिक राजधानीत परवानगी द्यायची हा दुटप्पीपणा नव्हे का ? देशाचे भविष्य असलेल्या तरुणाईला नशेच्या गर्तेत जाण्यापासून रोखायचे असेल तर सनबर्न फेस्टिव्हलला शक्तीनिशी विरोध करून कार्यक्रमाला दिलेली परवानगी रहित करण्यासाठी सरकारवर दबाव आणावा लागेल !

**सौ. मोक्षदा घाणेकर, काळाचौकी, मुंबई**

## खुस्पटे...

सवय रे माणसांची
काढत बसे खुस्पटे
करुन ठेवी जखमा
पुन्हाकाढे सालपटे

सरळ असूनि रस्ते
चालत राही उलटे
मन असे सरड्याचे
रंग बदलतं पालटे

सुग्रास असून अन्न
चिवडता रे खरकटे
पुरेना आधीचं अन्न
टाकत राहतात उष्टे

आवड ती घाणीची
फिरत राही चिलटे
वृत्ती वटवाघूळाची
टांग स्वताला उलटे

गर्दी जरीआप्तांची
कशास राही एकटे
जिथे तिथे खुपसा
नाक आपले नकटे

नीत हवा मोठेपणा
कामअसता धाकटे
माणूसअसे नावास
कशी बिरुदे चिकटे

**- हेमंत मुसरीफ पुणे.**
**९७३०३०६९९६.**

अक्षराज
अचूक ... बातमी

# वीरपुत्र फतेह सिंह आणि जोरावर सिंह

सध्याच्या स्पर्धात्मक युगात आपल्या पाल्याचा निभाव लागावा यासाठी शहरासारख्या ठिकाणी बहुतांश हिंदु पालक आपल्या पाल्यांना कॉन्व्हेंट शाळांत घालत आहेत. या ठिकाणी शिक्षणासोबत विद्यार्थांना ख्रिस्ती पंथाच्या परंपरा, इतिहास यांच्या संदर्भातही माहिती दिली जात असल्याने या हिंदू मुलांच्या घरी ख्रिसमस सुध्दा दिवाळीसारखा साजरा होऊ लागला आहे. पालकांना २५ डिसेंबर ते १ जानेवारी दरम्यान ख्रिस्ती इतिहासात काय काय घडले याची इथंभूत माहिती असते; मात्र २१ ते २७ डिसेंबर या दिवसांत भारताच्या इतिहासात काय घडले हे मात्र ठाऊक नसते, केवळ त्यांनाच नाही आपल्यापैकी अनेकांना या दिवसांचा पराक्रमी इतिहास ठाऊक नाही. शीख समाजातील लोक डिसेंबर महिन्यातील या सात दिवसांत कोणतेही शुभकार्य करत नाहीत. त्यांच्यासाठी हा सप्ताह अत्यंत दुःखद आणि वेदनादायी समजला जातो. या सात दिवसांत शिखांचे दहावे गुरू गुरु गोविंद सिंह यांचे संपूर्ण कुटुंब धर्माकरीता हुतात्मा झाले.

२१ डिसेंबर १७०४ या दिवशी सिरसा नदीच्या काठावर चमकौर येथे शीख आणि मुघल यांच्यात घनघोर लढाई झाली. हीच लढाई पुढे 'चमकौरची लढाई' नावाने इतिहासात अजरामर झाली. गुरु गोविंद सिंह यांच्या नेतृत्वाखाली केवळ ४० शिखांनी वजीर खानच्या १० लक्ष मुघल सैनिकांशी जीवाच्या शिकस्तीने लढा दिला. २१ डिसेंबरला श्री गुरु गोविंद सिंह यांनी आपल्या कुटुंबासह श्री आनंदपूर साहिबचा किल्ला सोडला. २२ डिसेंबरला गुरु साहिब आपल्या दोन मोठ्या मुलांसह चमकौरच्या मैदानावर पोहोचले. त्यांच्या घरातील स्वयंपाक्याने गुरू साहिबांची पत्नी आणि दोन लहान मुलांना आपल्या घरी नेले. चमकौरच्या लढाईत शत्रूंशी लढताना गुरू साहिब यांचा १७ वर्षीय मोठा मुलगा अजित सिंह आणि १४ वर्षाचा धाकटा मुलगा जुझार सिंह त्यांच्या ११ साथीदारांसह धर्म आणि देश यांच्या रक्षणासाठी हुतात्मे झाले. २३ डिसेंबरला गुरु गोविंद सिंहांची पत्नी आणि दोन्ही लहान मुलांना फितुरीने पकडण्यात आले. २४ डिसेंबरला आई गुजर कौर आणि दोन भावांना सरहिंद येथे नेण्यात आले. २५ डिसेंबरला ६ वर्षाच्या धाकट्या मुलाला म्हणजे फतेह सिंह यांना वजीर खानच्या दरबारात हजर करून त्यांना धर्मांतराचे आमिष दाखवण्यात आले. यावेळी वजीर खान ६ वर्षाच्या कोवळ्या फतेह सिंहांना मग्रुरीने सांगतो, 'इस्लाम धर्म स्वीकारा, नाहीतर मरणाला तयार राहा !' त्यावर फतेह सिंह तेवढ्याच बाणेदारपणे सांगतात, 'इस्लाम स्वीकारला, तर मरण येणार नाही का ? मरण येणारच असेल, तर ते आपल्या धर्मात राहून धर्मासाठी बलिदान करून मरण पत्करू' ६ वर्षे वयात कुठून आला हा धर्माप्रतीचा एव्हढा जाज्वल्य अभिमान ! फतेह सिंहांच्या या उत्तराने वजीर खानही चक्रावला. धर्मांतरास तयार न झाल्याने २६ डिसेंबरला ८ वर्षीय जोरावर सिंह आणि ६ वर्षांचे फतेह सिंह यांना भिंतीत जिवंत गाडण्यात आले. फतेह सिंहांच्या मानेपर्यंत वीटा बांधण्यात आल्या तेव्हा जोरावर सिंह रडू लागले आणि म्हणाले 'तू माझ्यानंतर जगात आलास; मात्र बलिदानात तू माझ्यापुढे चाललास' ६-८ वर्षांच्या वयात कोणामध्ये असते एव्हढे धैर्य आणि एव्हढा त्याग ! ज्या वयात मुलांना पदोपदी आई वडिलांच्या आधाराची गरज भासते त्या वयात या दोघा भावंडांचा धर्माप्रतीचा त्याग, धर्मासाठी हसत हसत बलिदान करण्याची वृत्ती केवळ अवर्णनीय आहे. दोन्ही मुलांच्या बलिदानाचे वृत्त माता गुजर कौर यांच्या कानी पडताच २७ डिसेंबरला त्यांनीही प्राणत्याग केला.

काश्मीर मधील हिंदूंचे धर्मांतर थांबावे यासाठी गुरु गोविंद सिंह यांचे पिता गुरु तेगबहाद्दूर सिंह यांनी स्वतःहून बलिदान दिले. रामजन्मभूमीच्या मुक्तीसाठीही त्यांनी प्रयत्न केले. शिखांच्या सर्वच गुरुनी हिंदू धर्माच्या रक्षणासाठी प्रसंगी स्वतःचे प्राण पणाला लावले. गुरु गोविंद सिंहाच्या परिवाराच्या त्यागाचे स्मरण म्हणून केंद्र सरकारने गतवर्षीपासून २६ डिसेंबर 'वीर बाल दिवस' म्हणून साजरा करण्याचे जाहीर केले. गुरु गोविंद सिंहांच्या पुत्रांनी दाखवलेले शौर्य आणि धर्माभिमान ही भारतभूमी कधीही विसरणार नाही, नाताळ हा ख्रिस्ती बांधवांचा प्रमुख सण आहे. त्यांनी तो उल्हासात साजरा करावा. याच नाताळच्या दुसऱ्या दिवशी म्हणजे २६ डिसेंबरला भारतमातेच्या दोन वीरपुत्रांची पुण्यतिथी असते. आपल्यापैकी किती जणांना याची माहिती आहे. लहान वयातच देश आणि धर्म यासाठी बलिदान करण्यास सिद्ध झालेल्या अशा वीरपुत्रांच्या आणि त्यांना घडवणाऱ्या पालकांच्या कथा मोबाईल गेम्स आणि इंटरनेटच्या दुनियेत हरवलेल्या आजच्या पिढीला ज्ञात असणे आवश्यक आहे. भारतभूमी ही शूरांची, वीरांची आणि क्रांतिकारकांच्या निस्सीम त्यागाची भूमी आहे. धर्माप्रती आणि देशाप्रती त्याग करण्याची भविष्यात वेळ आलीच तर या वीरपुत्रांचा आदर्श आपल्या डोळ्यासमोर राहायला हवा !

**- जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**
**संपर्क क्रमांक : ९६६४५५९७८०**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## शिवसेना (उबाठा) आयोजित मिनी मॅराथॉन स्पर्धा



**अक्षराज : अनंत बोरसे**

**दि.१४, शहापूर (ठाणे) :** रविवार, दिनांक १४ डिसेंबर २०२५ रोजी शहापूरमध्ये शिवसेना (उबाठा) च्या वतीने मिनी मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. ही स्पर्धा पहिला गट ५ वी ते ७ वी दोन किलो मीटर, दूसरा गट ८ वी ते १० वी तीन किलो मीटर, तिसरा गट १२ वी ते १५ वी व आय. टी.आय. ५ किलो मीटर धावणे अशी घेण्यात आली. या स्पर्धेत शहापूर मधील जवळपास १७ शाळांमधील दीड हजार विद्यार्थी विद्यार्थीनींनी सहभाग घेतला होता. सकाळी सात वाजता शहापूर येथील शिवतीर्थ येथुन स्पर्धेला सुरुवात झाली. या स्पर्धेत लहान मुलांच्या गटातील सार्थक इंग्लिश मीडियम स्कूल चा साई विशे प्रथम तर म.ना बरोरा विद्यालयाचे निशात वेखंडे, रुद्र घरत यांनी अनुक्रमे दुसरा व तिसरा क्रमांक पटकावला, तर समाधान सदगीर आणि तन्मय कनोजा यांनी ऊत्तेजनार्थ पारितोषिक मिळवले. तर मुलींच्या गटातुन म.ना. बरोरा शाळेच्या साक्षी ढोन्नर, पल्लवी ढोन्नर यांनी पहिला व दुसरा क्रमांक पटकावला तर दमानी स्कुल ची रोहिणी जाधव ही तृतीय क्रमांक विजेती ठरली. ईश्वरी चंदगीर, अर्चना शर्मा या ऊत्तेजनार्थ ठरल्या. आठवी ते दहावी गटात अविष्कार म.ना.बरोबर प्रथम,जय लोखंडे म.ना.बरोरा द्वितीय ,ऋग्वेद विशे सार्थक इंग्लिश मीडियम स्कूल, तृतीय तर मुलींमध्ये श्रावणी सोनार, अबोली शिंदे ग.वि.खाडे ,उज्वला दिवेकर आनंद दिघे हायस्कूल, रीना मुकणे आनंद दिघे,मिताली यादव ग.वी .खाडे,मोठ्या गटातआशिष भगरे, विक्रम भवर ,विजय वीर सोनू भाऊ बसवंत महाविद्यालय, कौस्तुभ बोंद्रे आय.टी.आय ,अविनाश शिंदे एस बी कॉलेज, मुली भाग्यश्री विदे, काजल पानेरा, अर्चना महाले, श्रद्धा माळी ,रूपालीी सातपुते खाडे विद्यालय यांनी पारितोषिके पटकाविली. यावेळी पाहुणे म्हणून विश्वास थळे, कुंदन पाटील, तालुकाप्रमुख कुलदीप धानके,योगेश निमसे, रश्मी निमसे, गुलाब भेरे, काशिनाथ तिवरे, स्वानंद शेलावले सह मान्यवर उपस्थित होते. या मिनी मॅरेथॉन स्पर्धेसाठी शहापूर पोलीस, आरोग्य विभाग ,नगरपंचायत कर्मचारी, क्रीडाशिक्षक व सामाजिक सांस्कृतिक मंडळे यांचे सहकार्य लाभले. स्पर्धेचे आयोजन शिवसेना शहापूर शाखेचे शहर अध्यक्ष विजय देशमुख आणि त्यांचे सहकारी यांच्या संकल्पनेतून आणि पुढाकाराने करण्यात आले होते.

## ए आईच्या जमान्यात विद्यार्थ्यांचा विज्ञान प्रदर्शनाचा उपक्रम टाकाऊ पासून टिकाऊ



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१४, पुणे :** पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे, शिशुविहार प्राथमिक विद्यालय आकुर्डी, पुणे ४४ नेहमीच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकास होण्याच्या दृष्टीने मुख्याध्यापिका योगिता काळे यांच्या मार्गदर्शनाखाली विविध उपक्रम आयोजित केले जातात. त्याचाच एक भाग म्हणजे विद्यालयात आयोजित केलेले विज्ञान प्रदर्शन, चित्रकला, रांगोळी व टाकाऊ वास्तुपासून टिकाऊ वस्तू बनविणे यांचे प्रदर्शन आयोजित केले होते. विद्यार्थ्यांना AI च्या जमान्यात विविध विज्ञानाच्या कल्पकता याव्यात. हा या प्रदर्शना मागे हेतू होता. प्रदर्शनाचे उदघाटन - सामाजिक कार्यकर्ते व सचिव - भाजपा पिंपरी चिंचवड शहर (जिल्हा) दीपक भोंडवे, Adhira International School, पुनावळे - चेअरमन - नवनाथ भोंडवे, सचिन डोईफोडे यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडले. यामध्ये प्रामुख्याने इयत्ता - प्लेवर्ग ते बालवर्ग या विद्यार्थ्यांनी टाकाऊ पासून टिकाऊ वस्तू बनविणे, चित्र रंगभरण, तसेच इयत्ता १ ली ते चौथी च्या विद्यार्थ्यानी विज्ञान प्रदर्शन, चित्रकला, रांगोळी यासारख्या विविध उपक्रमात सहभाग घेतला होता. आलेल्या सर्व प्रमुख पाहुण्यांनी सर्वच विद्यार्थ्यांचे कौतुक केले. विद्यार्थ्यांनी बनविलेल्या सर्व प्रोजेक्ट उत्कृष्ट बनविले आहेत असे मत उपस्थित पाहुण्यांनी व्यक्त केले. अशाप्रकारे विद्यालयात मोठ्या उत्साहात विज्ञान प्रदर्शन पार पडले.

## चंद्रपूर मनपाचे नवे आयुक्त म्हणून अकनुरी नरेश रुजू



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१४, चंद्रपूर :** चंद्रपूर शहर महानगरपालिकेचे नवे आयुक्त भारतीय प्रशासकीय सेवेतील अधिकारी (आयएएस) अकनुरी नरेश यांनी १३ डिसेंबर २०२५ रोजी चंद्रपूर मनपात रुजू होत आयुक्त पदाचा कार्यभार स्वीकारला. चंद्रपूर महानगर पालिकेचे पहिल्यांदाच आयएएस दर्जाचा अधिकारी मिळाल्याने येथील प्रशासकीय कारभारात सुधारणा होईल, अशी चंद्रपूरकरांची अपेक्षा आहे. चंद्रपूर शहर महानगरपालिकेतील प्रशासनात शिस्तीचा अभाव आणि मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचाराच्या तक्रारीमुळे गत काही वर्षापासून नागरिकांमध्ये तीव्र असंतोष व्यक्त होत होता. अखेर सामान्य प्रशासन विभागाने अकनुरी नरेश यांची नियुक्ती चंद्रपूर महानगर पालिकेच्या आयुक्तपदी केल्याने सर्वसामान्य नागरिकांना दिलासा मिळाला आहे. चंद्रपूर मनपात आयएएस अधिकाऱ्यांची नियुक्ती करावी, अशी मागणी खासदार प्रतिभा धानोरकर यांनी केली होती. त्यामुळे धानोरकर यांनीही आता प्रशासनात पारदर्शकता येईल, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

## उबेर बाइक चालकाकडून तरुणीचा विनयभंग व जबरी चोरी

**अक्षराज : भानुदास गायकवाड**

**दि.१४, कल्याण :** कल्याण येथील महात्मा फुले चौक पोलीस ठाणे हद्दीत उबेर ॲपवरून बुक केलेल्या बाइक राईडदरम्यान २६ वर्षीय तरुणीचा विनयभंग व जबरी चोरी झाल्याची घटना १३ डिसेंबर २०२५ रोजी सायंकाळी ७ वाजण्याच्या सुमारास घडली. उबेर चालकाने तरुणीला निश्चित स्थळी न सोडता अंधाऱ्या ठिकाणी नेऊन तिचा विनयभंग केला व चाकूचा धाक दाखवून पर्समधील १,००० रुपये जबरीने काढून घेतले. या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपीस अटक करण्यात आली आहे. न्यायालयाने १८ डिसेंबर २०२५ पर्यंत पोलीस कोठडी मंजूर केली आहे.

# माळशेज रेल्वे मार्गाला तातडीची मंजुरी द्या; खा.लंके यांचे रेल्वे मंत्र्यांना साकडे

### ३ जिल्ह्यांच्या विकासाला चालना मिळणार



**रेल्वे मंत्र्यांकडे ५ ठोस मागण्या**

खासदार निलेश लंके यांनी रेल्वे मंत्र्यांकडे केलेल्या मागण्यांमध्ये अहिल्यानगर - माळशेज घाट - कल्याण या नवीन रेल्वे मार्गाला तात्काळ अंतिम मंजुरी द्यावी,२०२५-२६ या आर्थिक वर्षात निधी वाटपाचा पहिला टप्पा त्वरित जाहीर करावा, माळशेज घाट बोगदा प्रकल्पाच्या डीपीआरला तांत्रिक समितीची मंजुरी घेऊन अंतिम मान्यता द्यावी, या रेल्वे मार्गाचा विशेष रेल्वे प्रकल्प श्रेणी मध्ये समावेश करावा. इ.मागण्यांचा समावेश आहे.

**अक्षराज : वसंत रांधवन**

**दि.१४, अहिल्यानगर :** माळशेज घाट - कल्याण (२४६ किमी) हा अत्यंत महत्त्वाचा नवीन रेल्वे मार्ग महाराष्ट्रातील मुंबई, पुणे आणि नाशिक या तीन प्रमुख विभागांना थेट जोडणारा ठरणार असून, राज्याच्या औद्योगिक व भौगोलिक विकासाला नवी दिशा देणारा ठरू शकतो. या प्रकल्पाला तात्काळ अंतिम मंजूरी व आर्थिक तरतूद करावी, अशी ठाम मागणी खासदार नीलेश लंके यांनी केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांच्याकडे केली आहे.

गेल्या अनेक वर्षांपासून हा प्रकल्प प्रलंबित असल्याने प्रस्तावित लॉजिस्टिक्स कॉरिडॉरला मोठा फटका बसत आहे. सध्या मुंबई - नाशिक - मनमाड आणि पुणे - दौंड - अहिल्यानगर या मार्गांवर प्रचंड भार पडला असून, यामुळे मालवाहतूक खर्च वाढत आहे. परिणामी, उद्योगधंदे व गुंतवणूकदारांवरही प्रतिकूल परिणाम होत असल्याचे लंके यांनी पत्रात नमूद केले आहे.

मुंबई महानगर प्रदेश ते अहिल्यानगर - मराठवाडा विदर्भ या भागांना जोडणारा सक्षम पर्यायी रेल्वे मार्ग सध्या उपलब्ध नाही. अशा परिस्थितीत अहिल्यानगर - माळशेज घाट - कल्याण हा मार्ग भारतीय रेल्वेसाठी तांत्रिकदृष्ट्या व्यवहार्य, आर्थिकदृष्ट्या फायदेशीर आणि दीर्घकालीन दृष्टिकोनातून उपयुक्त असल्याचे त्यांनी अधोरेखित केले आहे.

या रेल्वेमार्गामुळे छत्रपती संभाजीनगर - अहिल्यानगर - मुंबई - मराठवाडा - विदर्भ या पट्ट्यात वाहतूक सुलभ होईल. दिल्ली - मुंबई औद्योगिक कॉरिडॉरसाठी पूरक रेल्वे मार्ग उपलब्ध होईल. बंदरांशी निगडित मालवाहतुकीचा खर्च मोठ्या प्रमाणात कमी होईल. कृषी, निर्यात, एमएसएमई, पर्यटन आणि औद्योगिक क्षेत्राला चालना मिळेल.

ठाणे, पुणे आणि ठाणे अहिल्यानगर - कल्याण तसेच कोकण प्रदेशाशी संपर्क अधिक गतिमान होईल. या प्रकल्पासाठी आवश्यक सर्वेक्षण, व्यवहार्यता अभ्यास व तांत्रिक चाचण्या मोठ्या प्रमाणात पूर्ण झाल्या आहेत. मात्र, अंतिम प्रशासकीय मंजुरी आणि निधी वाटपाचा टप्पा अद्याप प्रलंबित आहे. महाराष्ट्र सरकार, उद्योग विभाग, एमआयडीसी आणि स्थानिक स्वराज्य संस्थांनीही सातत्याने या प्रकल्पाच्या जलद अंमलबजावणीची मागणी केली आहे.

लंके यांनी २०२४ च्या संसद अधिवेशनातही हा मुद्दा उपस्थित केला होता. राज्य व देशाच्या सर्वांगीण विकासासाठी हा प्रकल्प अत्यावश्यक असून, केंद्र सरकारने तातडीने निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा खासदार निलेश लंके यांनी व्यक्त केली आहे. हा रेल्वे मार्ग मंजूर झाल्यास अहिल्यानगरसह संपूर्ण मध्य महाराष्ट्राच्या विकासाचा नवा अध्याय सुरू होईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

# पेण येथील स्ट्राँग रूमचा दरवाजा कोणीतरी उघडला; सीसीटीव्ही फुटेजमुळे चर्चांना विराम

**अक्षराज : मितेश जाधव**

**दि.१३, पेण (रायगड) :** पेण नगरपरिषद निवडणुकीच्या मतपेट्या ठेवलेल्या स्ट्राँग रूममध्ये धक्कादायक आणि तितकीच आश्चर्याची घटना घडली असून स्ट्राँग रूममधील एका टेबलाच्या कपाटाचा दरवाजा उघडलेल्या अवस्थेतील फोटो सोशल मीडियावर व्हायरल झाल्याने पेण शहरात मोठी खळबळ उडाली होती. मात्र सीसीटीव्ही फुटेज बघितल्यानंतर खरी परिस्थिती समोर आली आहे. फोटो व्हायरल होताच पेण मधील नागरिकांमध्ये शंका कुशंका व्यक्त केल्या जात होत्या. परंतु सीसीटीव्ही फुटेज चेक केल्यानंतर उंदरानेच दरवाजा उघडण्याचे पाहायला मिळाले आहे.पेण नगर परिषदेच्या निवडणुकीच्या मतपेट्या ठेवण्यात आलेल्या स्ट्राँग





रूमच्या टेबलाच्या कपाटाचा दरवाजा उघडल्याचे समजताच पेणमधील सर्वच राजकीय पक्षाच्या नेत्यांनी या घटनेबद्दल तात्काळ संशय व्यक्त केला आणि सुरक्षेबाबत प्रश्नचिन्ह उभे केले. हा दरवाजा नक्की कोणी उघडला याची शहानिशा करण्यासाठी पेणचे तहसीलदार तानाजी शेजाळ यांनी तातडीने सीसीटीव्ही फुटेज तपासले गेले. फुटेज पाहिल्यानंतर अधिकारी आणि सर्वच पक्षाच्या नेत्यांना आश्चर्याचा धक्का बसला; कारण चक्क एका उंदराने काही प्रयत्नांनंतर कपाटाच्या हँडलला स्पर्श करून दरवाजा उघडल्याचे स्पष्ट झाले. पेण तहसील कार्यालयाच्या आवारातील ज्या स्ट्राँग रूममध्ये नगरपरिषद निवडणुकां संदर्भातील महत्त्वाच्या मतपेट्या आणि साहित्य ठेवले आहे, तेथे ही 'उंदराची करामत' घडली.

या घटनेनंतर वाढलेला संशय आणि गैरसमज दूर करण्यासाठी पेणचे तहसीलदार तानाजी शेजाल यांनी तातडीने हस्तक्षेप केला. त्यांनी घटनेची गंभीर दखल घेत उपस्थितांना सीसीटीव्ही फुटेज दाखवले आणि उंदरामुळे हा प्रकार घडल्याचे स्पष्ट केले.

# मोरवा विमानतळाचा रनवे वाढवून आधुनिक सुविधा उभारा - आ.जोरगेवार

### हिवाळी अधिवेशनात राज्यमंत्री मुर्लीधर मोहोळ यांची भेट घेत मागणी



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१४, चंद्रपूर :** राज्याच्या हिवाळी अधिवेशना दरम्यान आमदार किशोर जोरगेवार यांनी राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांची भेट घेऊन मोरवा विमानतळाचा रनवे वाढविणे तसेच तेथे आधुनिक आणि सुसज्ज प्रवासी सुविधा उभारण्याची मागणी केली आहे. यावेळी सदर मागणीचे निवेदन ही आमदार किशोर जोरगेवार यांनी ना. मोहोळ यांना दिले आहे. चंद्रपूर हा जिल्हा औद्योगिक, आर्थिक आणि पर्यावरणीय दृष्टिकोनातून राज्यातील अत्यंत महत्त्वाचा जिल्हा म्हणून ओळखला जातो. कोळसा उत्खनन, औष्णिक वीज निर्मिती प्रकल्प, सिमेंट उद्योग, संरक्षण उत्पादनाशी संबंधित प्रकल्प, घनदाट वनसंपदा तसेच जागतिक पातळीवर ओळख असलेले पर्यटनस्थळ असलेल्या ताडोबा - अंधारी व्याघ्र प्रकल्पामुळे चंद्रपूर जिल्ह्याची आर्थिक घडी वेगाने बदलत आहे. या पार्श्वभूमीवर जिल्ह्याचा सर्वांगीण विकास अधिक वेगाने साध्य करण्यासाठी हवाई संपर्क अत्यंत आवश्यक बनला आहे.

सध्या चंद्रपूर आणि गडचिरोली या दोन महत्त्वाच्या जिल्ह्यांसाठी मोरवा एअर स्ट्रिप ही एकमेव हवाई सुविधा उपलब्ध आहे.

मात्र सद्यस्थितीत या एअर स्ट्रिपवर मर्यादित सुविधा असल्याने व्यावसायिक विमानसेवा सुरू करणे शक्य होत नाही. एअरपोर्ट अथॉरिटी ऑफ इंडियाच्या तांत्रिक अभ्यासानुसार आवश्यक पायाभूत सुविधा आणि सुधारणा केल्यास मोर्वा विमानतळावर एटीआर-७२ प्रकारचे प्रवासी विमान सहजपणे उतरू शकतात. यासाठी रनवेची लांबी किमान १८५० मीटरपर्यंत वाढविणे आवश्यक असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

यासोबतच आधुनिक टर्मिनल इमारत, प्रवासी प्रतीक्षालय, सुरक्षा व्यवस्था, अग्निशमन यंत्रणा, रात्रीच्या वेळेस उड्डाणासाठी आवश्यक प्रकाश व्यवस्था, वाहनतळ तसेच इतर मूलभूत सुविधा उभारण्याची गरजही येथे आहे. या सर्व सुविधा उपलब्ध झाल्यास चंद्रपूर जिल्ह्यातून नागपूर, मुंबई, दिल्ली, रायपूर यांसारख्या प्रमुख शहरांशी थेट हवाई संपर्क निर्माण होऊ शकतो. मोरवा विमानतळाचा विकास झाल्यास औद्योगिक गुंतवणुकीला चालना मिळेल, पर्यटन व्यवसाय वाढीस लागेल, स्थानिक युवकांसाठी मोठ्या प्रमाणावर रोजगाराच्या संधी निर्माण होतील तसेच जिल्ह्याचा दळणवळणाचा नकाशाच बदलून जाईल.

विशेषतः उद्योग, व्यापार, आरोग्य आणि शिक्षण क्षेत्रात चंद्रपूरला मोठा फायदा होणार आहे. हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प पूर्ण झाल्यास चंद्रपूर जिल्हा केवळ औद्योगिक केंद्र म्हणूनच नव्हे तर आधुनिक पायाभूत सुविधांनी सज्ज जिल्हा म्हणूनही राष्ट्रीय स्तरावर ओळखला जाईल. असे सदर निवेदनात आ. किशोर जोरगेवार यांनी म्हटले आहे.

# सखोल स्वच्छतेप्रमाणेच नागरिकांमध्ये स्वच्छतेविषयी जनजागृती मोहीम

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.१४, नवी मुंबई :** महानगरपालिका क्षेत्रात नियमीत करण्यात येणाऱ्या स्वच्छतेच्या जोडीला हवेतील धूळ प्रदूषण कमी करण्यासाठी सखोल स्वच्छता मोहीमा राबविल्या जात असून हमरस्ते, अंतर्गत भागातील मुख्य रस्ते तसेच एमआयडीसी क्षेत्रातील रस्त्यांवरील माती ब्रशने गोळा करून प्रक्रियाकृत पाण्याने रस्ते धुवून घेण्याची कार्यवाही मागील २० दिवसांपासून करण्यात येत आहे.यामध्ये आज नेरूळ सेक्टर ८ एल मार्केट ते मानक हॉस्पिटल या वर्दळीच्या रस्त्यावर सखोल स्वच्छता मोहीम राबविण्यात आली तसेच सेक्टर ११ ते १५ परिसरातही सखोल स्वच्छता करण्यात आली. तुर्भे विभागात सेक्टर १० सानपाडा येथे डी मार्ट परिसरात आणि बेलापूर सेक्टर १५ परिसरातही सखोल स्वच्छता मोहीमा प्रभावीपणे राबविण्यात आल्या.त्याप्रमाणेच ऐरोली विभागात सुशिलादेवी देशमुख महाविद्यालयातील एनएसएस युनिटच्या विद्यार्थ्यांसोबत सेक्टर १० ते १४ खाडीकिनारा परिसरात विशेष स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. मुंबई काटई ब्रिजखाली स्वच्छता शपथ घेऊन सुरू झालेल्या या मोहीमेमध्ये २८ गोणी कचरा संकलित करण्यात आला व तो लगेच घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पस्थळी वाहून नेण्यात आला. या स्वच्छता मोहीमांप्रमाणेच जुईनगर येथील अखंड हरीनाम सप्ताहाच्या ठिकाणी स्वच्छता अधिकारी, स्वच्छता निरीक्षक यांनी जाऊन मोठ्या संख्येने उपस्थित नागरिकांना कचरा वर्गीकरणाचे महत्व पटवून दिले व त्याविषयी माहिती दिली. प्लास्टिक वापराचे दुष्परिणाम सांगून प्लास्टिक पिशव्या आणि एकल वापर प्लास्टिकचा वापर टाळण्याचे आवाहन ही करण्यात आले.याशिवाय ऐरोली सेक्टर १४ कार्यक्षेत्रात मागील आठवड्यापासून प्रवीण गांधी विधीमहाविद्यालय विलेपार्ले यांच्या विद्यार्थी स्वयंसेवकांमार्फत सोसायट्यांमध्ये जाऊन कचरा वर्गीकरण व प्लास्टिक प्रतिबंधाविषयी जनजागृती करण्यात येत आहे. तसेच त्या परिसरात फिरणाऱ्या 'टो - गो' या ओल्या कचऱ्यापासून खतनिर्मिती करणाऱ्या विशेष वाहनाची माहिती देऊन नागरिकांनी या उपक्रमात सक्रिय सहभागी होण्याचे आवाहनही केले जात आहे. या विद्यार्थी स्वंयसेवकांना त्या भागातील महानगरपालिकेच्या भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारकात मुख्य स्वच्छता अधिकारी राजेंद्र इंगळे यांच्या हस्ते प्रमाणपत्रे वितरित करण्यात आली. महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी दिलेल्या निर्देशानुसार, अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार यांच्या मार्गदर्शनाखाली व घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपआयुक्त डॉ.अजय गडदे यांच्या नियंत्रणाखाली, सखोल स्वच्छता मोहीमांप्रमाणेच नागरिकांमध्ये स्वच्छतेविषयी व्यापक स्वरूपात जनजागृती ही करण्यात येत आहे.

